# BOMBAY ACT No. XXXIX OF 1959.

## AN ACT TO PROVIDE FOR UNIFORMITY IN THE PROVISIONS OF THE LEPERS ACT, 1898, IN ITS APPLICATION TO THE STATE OF BOMBAY.

# सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३९.

[राज्यपाल यांची संमति मिळाल्यानंतर "मुंबई राजपत्रांत" दिनांक १५ सप्टेंबर १९५९ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला].

## मुंबई राज्यास लागू असलेला महारोग्यांबाबत अधिनियम, १८९८ याच्या उपबंधांत एकसूत्रता आणण्याची तरतूद करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, महारोग्यांबाबत अधिनियम, १८९८ हा, तारीख १ नोव्हेंबर १९५६ च्या निकटपूर्वी जे प्रदेश भाग ब राज्यांत समाविष्ट होते त्या प्रदेशाव्यतिरिक्त, संबंध मुंबई राज्यास लागू आहे ;

आणि ज्याअर्थी, मुंबई राज्याच्या हैदराबाद प्रदेशांत, हैदराबादचा महारोगाबाबत अधिनियम, १९५३ अंमलांत आहे परंतु सौराष्ट्र प्रदेशांत असा कोणताहि तत्सम अधिनियम अंमलांत नाहीं ;

आणि ज्याअर्थी, महारोग्यांबाबत अधिनियम, १८९८ हा, दुसऱ्या राज्यांत घातलेले प्रदेश वगळून, पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यास लागू करतांना तो सुधारण्यांत आला आहे ;

आणि ज्याअर्थी, मुंबई राज्यास लागू असलेला महारोग्यांबाबत अधिनियम, १८९८ याच्या उपबंधांत एकसूत्रता आणण्याची तरतूद करणें आणि त्या कारणासाठीं, दुसऱ्या राज्यांत घातलेले प्रदेश वगळून, पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यांत अंमलांत असलेला तो अधिनियम मुंबई राज्याच्या उरलेल्या भागास लागू करणें आणि हैदराबादचा महारोगाबाबत अधिनियम, १९५३ रद्द करणें इष्ट आहे ;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या दहाव्या वर्षी याद्वारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

१. या अधिनियमास महारोग्यांबाबत (मुंबई एकीकरण) अधिनियम, १९५९ असें म्हणावें. लघु संज्ञा.

२. (१) महारोग्यांबाबत (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९५५ अन्वयें सुधारण्यांत आलेला महारोग्यांबाबत अधिनियम, १८९८ हा, याद्वारें मुंबई राज्याच्या हैदराबाद आणि सौराष्ट्र प्रदेशांस लागू करण्यांत येत आहे. सन १८९८चा अधिनियम क्रमांक ३ आणि सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, मुंबई राज्याच्या उरलेल्या भागास लागू करणें.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी, महारोग्यांबाबत (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९५५ हा मुंबई राज्याच्या ज्या प्रदेशांस लागू नव्हता त्या विदर्भ विभागास व कच्छ प्रदेशास याद्वारें लागू करण्यांत येत आहे ; आणि अशा प्रारंभानंतर महारोग्यांबाबत अधिनियम, १८९८ हा राज्याच्या त्या भागांतसुद्धां त्याद्वारें सुधारण्यांत आला आहे असें समजण्यांत येईल.

सन १८९८चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १ ची सुधारणा.

३. मुंबई राज्यास लागू असलेला, महारोग्यांबाबत अधिनियम, १८९८ याच्या कलम १ मधील पोट-कलम (२) मध्यें पुढील परंतुक दाखल करावें :—

"परंतु, महारोग्यांबाबत (मुंबई एकीकरण) अधिनियम, १९५९ याच्या प्रारंभानंतर, तो मुंबई राज्याच्या हैदराबाद व सौराष्ट्र प्रदेशांसहि लागू होइल.".

सन १९५४चा हैदराबाद अधिनियम क्रमांक ४ रद्द करणें.

४. हैदराबादेचा महारोगाबाबत अधिनियम, १९५३ हा, याद्वारें रद्द करण्यांत येत आहे.

(True translation)
P. S. THORAT,
Examiner of Books and Publications, Bombay.

---

## BOMBAY ACT No. XL OF 1959.

## THE BOMBAY (SECOND SUPPLEMENTARY) APPROPRIATION ACT, 1959.

मुंबई विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमति दिनांक १५ सप्टेंबर १९५९ रोजीं मिळालेली असल्यामुळें तो याद्वारें सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

एन्. के. द्रविड,
मुंबई सरकारचे सचिव, विधि विभाग.